सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. भाप्रसे-१५२५/ प्र.क्र.१४५/ २०२५/भाप्रसे-३, दि. ०१/०१/२०२६.

**विषय** :- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेतून (NPS) एकीकृत निवृत्तीवेतन योजनेत (UPS) स्थलांतर झालेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या मासिक अंशदानाबाबत करावयाची कार्यपध्दती.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. भाप्रसे-१५२५/प्र.क्र.१४५/२०२५/भाप्रसे-३, दि. ०१/०१/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०१०११५५८१२३७०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 02-01-2026 11:55:17

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेतून (NPS) एकीकृत निवृत्तीवेतन योजनेत (UPS) स्थलांतर झालेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या मासिक अंशदानाबाबत करावयाची कार्यपद्धती.**

# महाराष्ट्र शासन
## सामान्य प्रशासन विभाग
### शासन निर्णय क्रमांक भाप्रसे-१५२५/प्र.क्र.१४५/२०२५/भाप्रसे-३,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : ०१ जानेवारी, २०२६

**वाचा :** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.भाप्रसे-२५०६/प्र.क्र.३६०/०६/९, दि.१५.०२.२०१३
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४, दि.०६.०४.२०१५
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.रानियो-२०२३/प्र.क्र.६४/सेवा-४, दि.०४.१२.२०२३
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.४०/सेवा-४, दि.३०.१२.२०२४
५) केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाची अधिसूचना क्र.FX-१/३/२०२४-PR, दि.२४.०१.२०२५
६) केंद्र शासनाच्या पेन्शन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण (PFRDA), नवी दिल्ली यांची अधिसूचना क्र.PFRDA-१२/०१/०००१/२०२३-legal, दि.१९.०३.२०२५
७) केंद्र शासनाचे पत्र क्र.२५०१४/०१/२०२५- AIS-II(Pension), दि.३०.०४.२०२५
८) वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२५/प्र.क्र.२१/सेवा-४, दि.१०.०७.२०२५
९) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.भाप्रसे-१५२५/प्र.क्र.३२३/२०२५/भाप्रसे-३, दि.२२.१२.२०२५

**प्रस्तावना :** दिनांक १ जानेवारी, २००४ रोजी व त्यानंतर शासन सेवेत नियुक्त झालेले / होणारे महाराष्ट्र सवंर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असून सदर योजनेची अंमलबजावणी व कार्यपद्धती संदर्भाधीन क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. आता केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू असणाऱ्या केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना व अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना एकीकृत निवृत्तीवेतन योजना {Unified Pension Scheme (UPS)} निवडण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यासंदर्भात संदर्भाधीन क्र.५ अन्वये दि.२४.१.२०२५ रोजी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. तसेच, केंद्र शासनाच्या पेन्शन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण (PFRDA), नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन क्र.६ येथील दि.१९.३.२०२५ च्या राजपत्र अधिसूचनेद्वारे पेन्शन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण (NPS अंतर्गत UPS योजनेचे परिचालन) नियम, २०२५ जारी केले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांसाठी राज्यांतर्गत UPS ची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील ज्या अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेतून (NPS) एकीकृत निवृत्तीवेतन योजनेमध्ये (UPS) स्थलांतर करण्याचा विकल्प स्वीकारलेला आहे, त्या अधिकाऱ्यांसाठी एकीकृत निवृत्तीवेतन योजना (UPS) कार्यान्वित करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी :-

## केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण

१) निवृत्तीवेतन निधी नियामक व विकास प्राधिकरणाने (PFRDA) राष्ट्रीय निवृत्तीवेतन (NPS) प्रणालीसाठी Protean e-Gov Technologies Limited या संस्थेची केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRA) म्हणून नियुक्ती केली आहे. त्याच धर्तीवर एकीकृत निवृत्तीवेतन (UPS) योजनेअंतर्गत अखिल भारतीय सेवेतील सर्व अधिकाऱ्यांचे अभिलेखे केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRA) म्हणजेच Protean e-Gov Technologies Limited यांच्याकडून ठेवण्यात येतील.

२) एकीकृत निवृत्तीवेतन योजनेसाठी राज्य समन्वय अधिकारी (SNO), जिल्हा कोषागार अधिकारी (DTO) व आहरण व संवितरण अधिकारी (DDO) खालीलप्रमाणे राहतील :

- राज्य समन्वय अधिकारी (SNO) : संचालक, संचालनालय,लेखा व कोषागारे
- जिल्हा कोषागार अधिकारी (DTO) : संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
- आहरण व संवितरण अधिकारी (DDO) : संबंधित आहरण व संवितरण अधिकारी

३) सदर योजनेची अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य समन्वय अधिकारी यांची राहील, या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या यंत्रणांना राज्य शासनाशी संपर्क साधण्यासाठी राज्य समन्वय अधिकारी हे संपर्क केंद्र म्हणून कार्यरत असतील (He will be a single point contact/nodal office for various intermediaries of Unified Pension Scheme).

## अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांसाठी UPS अंतर्गत अंशदानाच्या वसुलीचा दर

४) UPS चा विकल्प स्वीकारलेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्याच्या मासिक वेतनातून वसूल करावयाचा अंशदानाचा दर त्याच्या मूळ वेतन अधिक महागाई भत्त्याच्या १०% इतका असेल. त्याचबरोबर राज्य शासनाच्या अंशदानाचा दर त्याच्या मूळ वेतन अधिक महागाई भत्त्याच्या १०% इतका असेल. सदर अंशदान वर्गणीदाराच्या व्यक्तीगत कॉर्पस (Individual Corpus) मध्ये जमा केले जाईल.

तसेच, केंद्र शासनाचे अंशदान मूळ वेतन अधिक महागाई भत्त्याच्या ८.५% इतके असेल. सदर अंशदान केंद्र शासनाच्या पूल कॉर्पस (Pool Corpus) मध्ये केंद्र शासनाकडून जमा केले जाईल.

## अंशदानाची वसुली

**५)** आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांनी एकीकृत निवृत्तीवेतन योजनेचा (UPS) विकल्प स्वीकारलेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्याच्या वेतन देयकामधून दरमहा केवळ अधिकाऱ्याच्या अंशदानाची वसुली मूळ वेतन अधिक महागाई भत्त्याच्या १०% याप्रमाणे करावी. **यामध्ये नियोक्त्याच्या अंशदानाचा समावेश नसावा.**

६) एकीकृत निवृत्तीवेतन योजनेचा (UPS) विकल्प स्वीकारलेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्याच्या मासिक अंशदानाची वसुली वेतन देयकातून केल्यानंतर अंशदानाची रक्कम व तपशील दर्शविणारी आवश्यक ती अनुसूची वेतन देयकासोबत जोडण्यात यावी.

७) एकीकृत निवृत्तीवेतन योजनेचा (UPS) विकल्प स्वीकारलेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांच्या अंशदानाची वजावट महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम २५९(१) अनुसार वेतन देयकाच्या दर्शनी भागावर कोषागार वजाती म्हणून दर्शविण्यात

यावी. कोषागार अधिकारी यांनी अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्याच्या स्वतःच्या अंशदानाची रक्कम खाली दर्शविल्याप्रमाणे संबंधित योजना संकेतांकामध्ये प्रवर्गनिहाय जमा म्हणून दर्शविण्यात यावी.

| अ.क्र. | प्रवर्ग | अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांच्या मासिक अंशदानाच्या जमेचे लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १. | भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांसाठी | ८२३५५०८१ |
| २. | भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांसाठी | ८२३५५०९२ |
| ३. | भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांसाठी | ८२३५५१०७ |

८) एकीकृत निवृत्तीवेतन योजनेचा (UPS) विकल्प स्वीकारलेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्याच्या वेतन देयकास प्रमाणक क्रमांक संस्करीत झाल्यानंतर, अधिदान व लेखा कार्यालय/ जिल्हा कोषागार कार्यालय यांनी नियोक्त्याच्या अंशदानाच्या रक्कमा आहरित करण्याकरिता म.को.नि. साधी पावती नमुना-४५ अ निरंक रकमेचे (Nil Bill) स्वतंत्र देयक सेवार्थ प्रणालीमध्ये Auto-generate स्वरूपात तयार करावे.

९) नियोक्त्याच्या अंशदानाच्या रक्कमा आहरित करण्याकरिता अधिदान व लेखा कार्यालय/ जिल्हा कोषागार कार्यालय यांनी "२०७१- निवृत्तीवेतने व इतर सेवानिवृत्ती लाभ, ०१ - नागरी, १२१ - एकीकृत निवृत्तीवेतन योजनेसाठी शासनाचे अंशदान, (०१) शासनाचे अंशदान, (०१)(०१) एकीकृत निवृत्तीवेतन योजना - अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांसाठी शासनाचे अंशदान (२०७१०८२९)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी यांचेकरिता ८२३५५०५४, भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी यांचेकरिता ८२३५५०६३ व भारतीय वन सेवेतील अधिकारी यांचेकरिता ८२३५५०७२ या लेखाशिर्षाखाली जमा म्हणून दर्शविण्यात याव्यात.

१०) अधिदान व लेखा कार्यालय/ जिल्हा कोषागार कार्यालय यांनी "८२३५ सर्वसाधारण व इतर राखीव निधी" या मुख्य लेखाशिर्षाखाली अधिकाऱ्याच्या व नियोक्त्याच्या अंशदानांच्या जमा केलेल्या रकमा आहरित करण्याकरीता ८२३५००६१ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून साधी पावती म.को.नि.नमुना ४५-अ मध्ये देयक सादर करावे.

## स्वीयेत्तर सेवेतील अंशदानाची वसुली

११) राज्य शासनाच्या मालकीच्या आणि/किंवा संनियंत्रणाखालील अथवा महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील स्वीयेत्तर सेवेत प्रतिनियुक्तीवर असलेल्या UPS चा विकल्प स्वीकारलेल्या अभासे अधिकाऱ्यांच्या अंशदानाच्या वसुली बाबतीत शासन निर्णय वित्त विभाग दि.१०.०७.२०२५ मध्ये NPS बाबत विहित केलेल्या सुधारित कार्यपद्धतीनुसार UPS बाबतही कार्यवाही करण्यात यावी. मात्र UPS स्वीकारलेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्याच्या अंशदानाचा दर त्याच्या मूळ वेतन अधिक महागाई भत्त्याच्या १०% इतका व स्वीयेत्तर नियोक्त्याच्या अंशदानाचा दर त्याच्या मूळ वेतन अधिक महागाई भत्त्याच्या १०% इतका वसूल करण्याची दक्षता स्वीयेत्तर नियोक्त्याने घ्यावी.

१२) स्वीयेत्तर सेवेत (प्रतिनियुक्तीवर) असलेल्या महाराष्ट्र संवर्गातील UPS चा विकल्प स्वीकारलेले अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांच्या तसेच नियोक्त्याच्या अंशदानाची

रक्कम खाली दर्शविल्याप्रमाणे संबंधित योजना संकेतांकांखाली जमा रक्कम म्हणून दर्शवावी.

| अ.क्र. | प्रवर्ग | लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १. | भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याच्या अंशदानाची रक्कम | ८२३५५०८१ |
| २. | भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या अंशदानाची रक्कम | ८२३५५०९२ |
| ३. | भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या अंशदानाची रक्कम | ८२३५५१०७ |
| ४. | स्वीयेत्तर सेवेतील नियोक्त्याच्या अंशदानाची रक्कम (भारतीय प्रशासकीय सेवा/ भारतीय पोलीस सेवा/ भारतीय वन सेवा) | ८२३५५११६ |

१३) स्वीयेत्तर सेवेतील (प्रतिनियुक्तीवरील) UPS चा विकल्प स्वीकारलेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या एकूण रकमांचा मेळ घेतल्यानंतर अधिदान व लेखा अधिकारी/ कोषागार अधिकाऱ्यांनी अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांचे अंशदान आणि स्वीयेत्तर नियोक्त्याचे अंशदान या दोन्ही रकमा आहरीत करण्याकरिता साधी पावती नमुना-४५ अ मधील एक देयक कोषागारावर सादर करावे. अशा देयकासोबत कर्मचाऱ्यांची यादी जोडण्याची आवश्यकता नाही. सदर एकूण रक्कम शासनाच्या ८२३५००६१ या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

१४) अधिदान व लेखा कार्यालय / जिल्हा कोषागार कार्यालय यांनी शासन परिपत्रक वित्त विभाग दि.०४.१२.२०२३ व दि.३०.१२.२०२४ मध्ये दर्शविलेल्या कालमर्यादेत अंशदानांच्या रक्कमा विश्वस्त बँकेकडे पाठवाव्यात. अशाप्रकारे वसूल केलेल्या अंशदानांच्या रक्कमा गुंतवणुकीकरिता नेमण्यात आलेल्या निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकांकडे पाठविण्यात येणार असल्याने सदर कालमर्यादा पाळण्याची जबाबदारी अधिदान व लेखा कार्यालय/ जिल्हा कोषागार कार्यालय यांची राहील.

**अभासेतील अधिकारी केंद्रीय अथवा आंतरराज्य प्रतिनियुक्तीवर असताना करावयाची कार्यवाही-**

१५) अभासेतील अधिकारी जेव्हा केंद्र शासनाच्या सेवेत अथवा आंतरराज्य प्रतिनियुक्तीवर जातील तेव्हा त्यांच्या प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वीच्या कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांचा कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक (PRAN) त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रामध्ये विनिर्दिष्टपणे नमूद करावा व ज्या महिन्यापर्यंत अंशदानाची वसुली करण्यात आली आहे त्याचा तपशील नोंदवावा. केंद्र अथवा आंतरराज्य प्रतिनियुक्तीच्या कालावधीत कार्यरत असताना संबंधित अधिकाऱ्यांचे अंशदान १०% व प्रतिनियुक्तीवरील नियोक्त्याचे अंशदान १०% संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या कार्यालयाकडून परस्पर विश्वस्त बँकेकडे जमा करण्यात यावे व त्याचा तपशील केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडे पाठविण्यात यावा.

१६) तथापि, केंद्रीय अथवा अन्य राज्यांतील स्वायत्त संस्थांना UPS लागू नसल्यास अशा आस्थापनांवर कार्यरत असलेल्या महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांचे अंशदान १०% व प्रतिनियुक्तीवरील नियोक्त्याचे अंशदान १०% वसुली करून परि.क्र.१७ मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करावी.

**अभासेतील अधिकारी परदेशी प्रतिनियुक्ती / परदेशी अभिहस्तांकनाच्या कालावधीतील अंशदानाची वसुली :**

१७) महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकारी जेव्हा परदेशी प्रतिनियुक्तीवर किंवा परदेशी अभिहस्तांकनावर (Foreign Assignment) जातील, तेव्हा संबंधित अधिकारी परदेशी प्रतिनियुक्तीवर किंवा परदेशी अभिहस्तांकनावर गेले नसते तर त्यांचे राज्य शासनाच्या सेवेत जे वेतन राहिले असते, ते वेतन (Notional Pay) अधिक त्यावरील महागाई भत्ता याप्रमाणे येणाऱ्या एकूण रकमेच्या १०% एवढे परदेशी प्रतिनियुक्ती किंवा परदेशी अभिहस्तांकनाच्या कालावधीतील अधिकाऱ्यांचे दरमहा अंशदान व परकीय नियोक्त्याचे १०% अंशदान एकाच धनाकर्षाद्वारे तपशीलासोबत खालील तक्त्यात प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या सहाय्यक संचालक (लेखा) यांच्याकडे दरमहा जमा करण्याची जबाबदारी संबधित अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचेवर राहील.

| | |
|---|---|
| भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी | सहाय्यक संचालक (लेखा), भाप्रसे-४, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ |
| भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी | सहाय्यक संचालक (लेखा), भापोसे कक्ष, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ |
| भारतीय वन सेवेतील अधिकारी | सहाय्यक संचालक (लेखा), भावसे कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ |

असे धनाकर्ष "Assistant Pay and Accounts Officer, Mumbai" यांच्या नावे काढण्यात यावेत.

१८) संबंधित विभागाच्या सहाय्यक संचालक (लेखा) यांनी असे सर्व धनाकर्ष मुंबईतील सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी यांच्याकडे सर्व आवश्यक त्या माहितीसह तसेच परिच्छेद-१२ मध्ये दर्शविलेल्या संबंधित लेखाशीर्षाखाली रक्कम जमा करण्याकरिता चलनाच्या चार प्रती आणि वसुली प्रित्यर्थच्या अनुसूचीच्या दोन प्रतींसह पाठवावे. सहाय्यक अधिदान व लेखा अधिकाऱ्यांनी सदर धनाकर्ष प्राप्त झाल्याच्या दिनांकानंतरच्या लगतच्या कामाच्या दिवशी स्वतःच्या बँक खात्यात भरावा. सहाय्यक अधिदान व लेखा अधिकाऱ्यांनी त्यानंतर त्या रकमेचा धनादेश काढून तो संबंधित विभागाच्या सहाय्यक संचालक (लेखा) यांच्याकडून प्राप्त झालेल्या चलनाव्दारे संबंधित लेखाशीर्षाखाली शासकीय लेख्यात जमा करावा (धनाकर्ष बँक खात्यात जमा केल्याच्या दिनांकापासून कामाच्या ३ दिवसांच्या आत) व चलनांच्या प्रती त्यांचेकडील अभिलेख्यामध्ये ठेवाव्यात. अशा अभासे अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या, अधिकाऱ्यांच्या तसेच नियोक्त्याच्या अंशदानाच्या रकमेचा एक धनाकर्ष आणि त्यासोबतची इतर आवश्यक माहिती व कागदपत्रे सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्याकडे मुदतीत सादर करण्याची तसेच त्याबाबतचे लेखे त्यांच्या स्तरावर ठेवण्याची जबाबदारी संबंधित सहाय्यक संचालक (लेखा) यांची राहील. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांच्या अंशदानाच्या व परकीय नियोक्त्याच्या अंशदानाच्या रकमांचा धनाकर्ष कोषागाराच्या बँक खात्यात जमा करण्याची, त्याचा तपशील केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांचेकडे पाठविण्याची आणि रक्कम विश्वस्त बँकेकडे हस्तांतर करण्याची कार्यवाही करण्याची जबाबदारी अधिदान व लेखा कार्यालय यांची राहील.

**ताळमेळ**

१९) या योजनेखालील रकमांचा मासिक व त्रैमासिक ताळमेळ कोषागारांकडून विश्वस्त बँकेत पाठविलेल्या रकमांशी घेण्याची जबाबदारी अधिदान व लेखा अधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी यांची राहील. कोषागाराकडे हस्तांतरीत केलेल्या रकमांचा ताळमेळ घेण्याची जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

**अखिल भारतीय सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत कार्यवाही**

२०) जे अधिकारी अखिल भारतीय सेवेत नव्याने नियुक्त झालेले आहेत व ज्यांना एकीकृत निवृत्तीवेतन योजनेचा (UPS) विकल्प स्वीकारायचा आहे, अशा अधिकाऱ्यांनी अखिल भारतीय सेवेत रूजू झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत या शासन निर्णयासोबत जोडलेल्या नमुना A-१ मध्ये यथोचितरित्या माहिती भरुन संबंधित अधिकारी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे सादर करावा. संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सेवार्थ प्रणाली मधील "OPGM" सुविधेद्वारे संबंधित अधिकाऱ्याचा UPS PRAN तयार करावा.

**संकीर्ण सूचना**

२१) केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडून कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांकासंबंधीचे (PRAN) वार्षिक विवरणपत्र संबंधित अधिकाऱ्यास दरवर्षी परस्पर पाठविण्यात येईल. तसेच केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण संबंधित अधिकाऱ्यास त्यांच्या PRAN खात्यामधील जमा रकमेचा तपशील संकेतस्थळावर पाहण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देईल.

२२) एकीकृत निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात जमा करण्यात येत असलेले अंशदान योग्य असल्याची खात्री दरमहा करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील. त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याबाबत संबंधित अधिकाऱ्याने संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यास लेखी निवेदन देणे आवश्यक आहे. जे अधिकारी याप्रमाणे कार्यवाही करणार नाहीत ते भविष्यात कोणतीही तक्रार (कायदेशीर कार्यवाही) करु शकणार नाहीत.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६५/२०२५/सेवा-४, दि.३१.१२.२०२५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०१०११५५८१२३७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SUBHASH HANMANT UMARANIKAR
Date: 2026.01.01 16:00:44 +05'30'

**(सु. ह. उमराणीकर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास विभाग, गृहनिर्माण, सा.बां (सा.उ.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री ( वित्त, नियोजन, रा.उ.शु.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) अ.मु.स, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अ.मु.स. (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९) महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर.
१०) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर.
११) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव.
१२) मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४) प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१७) राज्य अभिलेख देखभाल अभिकरण तथा राज्य समन्वय अधिकारी
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९) सहाय्यक संचालक (लेखा), भाप्रसे-४, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) सहाय्यक संचालक (लेखा), भापोसे कक्ष, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२१) सहाय्यक संचालक (लेखा), भावसे कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२२) गृह विभाग (कार्यासन पोल-१), मंत्रालय, मुंबई
२३) महसूल व वन विभाग (भावसे कार्यासन), मंत्रालय, मुंबई
२४) वित्त विभाग (सेवा-४, अर्थसंकल्प-२, व्यय-४), मंत्रालय, मुंबई
२५) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
२६) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन भाप्रसे-१, भाप्रसे-४, अर्थसं व रोखशा) मंत्रालय, मुंबई
२७) NSDL e-Governance Infrastructure Limited, ४ था मजला, ए विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला हिल कम्पाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई-१३ ( पत्राने/ईमेलद्वारे)
२८) निवडनस्ती (भाप्रसे-३)

**Form A1**

**UNIFIED PENSION SCHEME (UPS) – SUBSCRIBER REGISTRATION FORM - Government Sector**

**Exercise of Option to be covered under Unified Pension Scheme (UPS) and to avail its Benefits**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of CRA** | | | | | Paste recent photograph of 3.5 cm x 2.5 cm size / passport size (Do not sign across staple clip) |
| Print my PRAN in Hindi | | Yes | | No | If yes, please submit details as per Annexure I |
| Select your category [Please tick (√)] | | Central Government | | | |

To,
National Pension System Trust
Dear Sir/Madam,

I,...............................................................................................Son/Daughter of Mr /Mrs...........................................having joined Central Government service on............. and having read and fully understood the provisions of the Unified Pension Scheme (UPS) as notified by the Central Government vide notification F.No. FX-1/3/2024-PR, dated 24/01/2025 and PFRDA (Operationalisation of Unified Pension Scheme under National Pension System) Regulations, 2025, as amended from time to time, and being eligible to opt for Unified Pension Scheme, do hereby exercise the option to be covered under Unified Pension Scheme (UPS). Further, I hereby acknowledge that this option exercised by me shall be final and irrevocable. I hereby request that an UPS account be opened in my name as per the particulars given below:

* indicates mandatory fields. Please fill the form in English and BLOCK letters (Refer general guidelines at instructions page.)

**1. PERSONAL DETAILS:** (Refer Sr. No. 1 of the instructions) *Use Annexure II if name exceeds the space provided below*

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Salutation* | | Shri | | Smt | | Kumari | |
| Applicant Name* | | | | | | | |
| Father's Name | | | | | | | |
| Mother's Name | | | | | | | |
| Orphan Status* | | Yes | | No | | | |
| Either Father's or Mother's name is mandatory* | Select the name to appear on PRAN Card* | | Father's Name | | Mother's Name | | |
| Date of Birth* | | | | | | | |
| Place of Birth* | | | | | | | |
| Country of Birth* | | | | | | | |
| PAN* | | | | Nationality* | | | |
| Applicant Gender* | Male | Female | Transgender | Marital Status* | Unmarried | Married | |
| Legally wedded Spouse Gender (*if married*) * | Male | Female | Transgender | Legally wedded Spouse DOB (*if married*) * | | | |
| Legally wedded Spouse Name (if married)* | | | | | | | |
| Income Range (per annum) * | Below 1 lac | 1 lac to 5 lac | 5 lac to 10 lac | 10 lac to 25 lac | 25 lac to 1 Cr | Above 1 Cr | |
| Please Tick if Applicable | Politically exposed person | Related to Politically exposed person | (Refer instruction no. 1) | | | | |

**2. PROOF OF IDENTITY and ADDRESS (POI / POA)* (Any one of the following to be submitted)**

| | | | |
|---|---|---|---|
| Passport | | Passport Expiry Date | |
| Driving License | | Driving License Expiry Date | |
| Government ID Card | | Voter ID Card | |
| CKYC Number | | | |
| National Population Register | | | |
| Proof of possession of Aadhaar | | Provide last Four Digits. Redact or black-out first 8 digits of the Aadhaar number on submitted copy (Refer Sr. No. 2 of the instruction) | |

**3. ADDRESS DETAILS***

| | |
|---|---|
| Line 1 | |
| Line 2 | V I L L A G E / C I T Y |

| | | | |
|---|---|---|---|
| District | | State/U.T. | |
| Country | | PIN Code | |
| **4. CONTACT DETAILS*** | | | |
| Mobile* | | Telephone with STD code | |
| Email ID* | | | |
| **5. BANK DETAILS*** (Proof to be submitted - Refer Sr No. 3 of the instructions) | | | |
| Account Type | Saving A/c | Current A/c | |
| Bank A/c Number | | | |
| Bank Name | | IFS Code | |
| I hereby declare that, the bank account detail provided are salary bank account. | | | |

| | | |
|---|---|---|
| **6. SELECTION OF PENSION FUND (PF) AND INVESTMENT CHOICE*** (Refer Sr no. 4 of the instructions) | | |
| Please Tick (√) one | | **Default Pattern (pension funds and investment Pattern as determined by the Authority)** |
| | | I would like to choose my Pension Fund and investment choice (Please select below) |

| **Pension Fund** (Please Tick (√) one) | | | | **Investment Choice** (Please Tick (√) one) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Aditya Birla Sunlife Pension Mgmt Ltd | | Axis Pension Fund Mgmt Limited | | | |
| | DSP Pension Fund Managers Pvt Ltd | | HDFC Pension Fund Mgmt Ltd | Active Choice (i.e. 100% in Govt Securities) | | |
| | ICICI Prudential Pension Funds Mgmt Co Ltd | | Kotak Mahindra Pension Fund Ltd | or | | |
| | LIC Pension Fund Limited | | Max Life Pension Fund Mgmt Ltd | Auto Choice | Conservative (LC25) | |
| | SBI Pension Funds Private Limited | | TATA Pension Management Private Ltd | | Moderate (LC50) | |
| | UTI Pension Fund Limited | | | | | |
| If no Pattern is chosen, the contributions will be invested as per default Pattern | | | | | | |

**7. FATCA* (Foreign Account Tax Compliance Act) & CRS DECLARATION (Refer Sr no. 5 of the instruction):**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| I am a tax resident of India and not resident of any other country | | I am a tax resident of the country/ies mentioned below | | |
| US Person | | Yes | | No |

| Particulars | | Country (1) | Country (2) | Country (3) |
|---|---|---|---|---|
| Country/countries of Tax Residency | | | | |
| Address in the jurisdiction for Tax Residence | Address Line 1 | | | |
| | City/Town/ Village | | | |
| | State | | | |
| | ZIP/Post Code | | | |
| Tax Identification Number (TIN)/Functional equivalent Number | | | | |
| TIN/ Functional equivalent Number Issuing Country | | | | |
| Validity of documentary evidence provided (Wherever applicable) | | ddmmyyyy | ddmmyyyy | ddmmyyyy |

DGP-D36/57/2025-DESK 36 I/121924/2026



| | |
|---|---|
| I have understood the information requirement of the Form (read along with the FATCA / CRS Instructions and Terms & Conditions) and hereby confirm that the information provided by me/us on this Form is true, correct and complete and hereby accept the same. | Signature / Thumb Impression* of Applicant (refer instructions) |

**8. DECLARATION BY APPLICANT*** (Refer Sr no. 6 of the instructions)

| | |
|---|---|
| I have read and understood the terms and conditions of the Unified Pension Scheme (UPS). The information and documents furnished by me are true and correct, to the best of my knowledge. Any changes in the information furnished by me shall be informed to CRA / NPS Trust. I understand that I shall be fully liable for submission of any false or incorrect information or documents.<br><br>I authorize the CRA, NPS Trust or any other entity connected with UPS to collect and share data/ details of my necessary personal information for the purpose of the said scheme regulated under the PFRDA Act, 2013 and the relevant regulations notified thereunder.<br><br>**Declaration under the Prevention of Money Laundering Act, 2002**<br><br>I hereby declare that the contribution paid by me/on my behalf has been derived from legally declared and assessed sources of income. I understand that NPS Trust has the right to peruse my financial profile or share the information, with other government authorities. I further agree that NPS Trust has the right to close my PRAN in case I am found violating the provisions of any law relating to prevention of money laundering. | Signature / Thumb Impression* of Applicant<br><br>(*LTI in case of males and RTI in case of females to be provided. Toe impression in case no hands) |
| Date \| \| \| \| \| \| \| \| \| Place | |

**9. DECLARATION BY NODAL OFFICER (All * Mark fields are Mandatory)**

**Employment Details** (At the time of exercise of UPS option)

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Date of joining* | | | | | | | | | Date of Superannuation* | | | | | | | | |
| Date of commencement of qualifying service* | | | | | | | | | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| Employee Code/ID* | |
| Post (Optional) | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Group (Optional) | A | | B (Gazetted) | | B (non-Gazetted) | | C | | D | | E | | other | |
| Service(Optional) | IAS | | IPS | | IFS | | Group A | | Group B | | other | | | |

| | |
|---|---|
| Basic Pay* | |
| Pay Scale (Optional) | |
| Name of the office* | |
| Department* | |
| Ministry* | |

| | | | |
|---|---|---|---|
| DDO Registration Number* | | PAO / CDDO / PrAO Registration Number* | |

| |
|---|
| *Qualifying Service as defined in Regulation 2(k) read with Regulation 13 of PFRDA (Operationalisation of Unified Pension Scheme under NPS) Regulations, 2025. |
| It is certified that Shri./Smt./Kumari..........................................................is employed in this office and the details provided in this subscriber registration form have been verified as per service record. The given address and officially valid documents (OVDs) of KYC are verified by this office. Also, it is further certified that he/she has read entries/entries have been read over him/her by us and got confirmed by him/her. |

| | | | |
|---|---|---|---|
| Name of DDO | | Name of PAO | |
| Signature of DDO | | Signature of PAO | |
| DDO Code No. (As per record in CRA System) | | PAO Code No. (As per record in CRA System) | |
| Seal of DDO | | Seal of PAO | |
| Date | | Date | |
| Place | | Place | |

**ACKNOWLEDGEMENT**

| | |
|---|---|
| Name of the Subscriber | |
| Date of Receipt of Application: | |

**INSTRUCTIONS FOR FILLING THE SUBSCRIBER REGISTRATION FORM**

**General guidelines**

(a) Please fill in legible handwriting to avoid errors. Do not overwrite. Corrections should be countersigned by the applicant. Applications incomplete in any aspect (or) if mandatory fields are left blank (or) with unclear photograph (or) not accompanied by required documents (or) not authenticated by the Nodal Office are liable to be rejected.

(b) Copies of documents submitted by the applicant should be self-attested.

(c) Applicant is advised to retain the acknowledgement slip signed / stamped by the designated nodal officer where they submit the application.

| Sl | Item No | Item Details | Instructions |
|---|---|---|---|
| 1 | 1 | Fathers Name, Mother's Name | (a) If the name has more than 30 digits, fill Annexure II for the same.<br>(b) If the applicant is an Orphan, he/she may leave the fields blank. However, an official document to support the status to be submitted. |
| | | Politically Exposed Person | Politically Exposed Person's (PEPs) are individuals who are or have been entrusted with prominent public functions such as heads of state or of the government, senior politicians, senior government, judicial or military officials, senior executives of state-owned corporations, important political party officials |
| 2 | 2 | Proof of Identity | If the applicant is submitting Aadhaar as proof of Identity, the first 8 digits of the Aadhaar number should be redacted / masked on the submitted copy. |
| 3 | 5 | Bank Details | For UPS account opening through physical form (FORM A1) bank details and documentary proof are mandatory. Please submit a cancelled cheque / copy of bank passbook / bank statement / bank certificate / letter from Bank containing applicant's Name, Bank Name, Bank Account Number and IFS Code. |
| 4 | 6 | Selection of Pension Fund (PF) & Investment Choice | Government employee/subscribers can exercise choice of Pension Funds and allocate their investments either in Asset Class 'G' under 'Active Choice' or in Life Cycle Funds - LC 50 or LC 25 under 'Auto Choice'.<br>If no choice is provided, the contributions will be distributed among the default Pension Funds and investment pattern selected by the Government. |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | 7&8 | FATCA & CRS Declaration / Signature by Applicant | Clarification / Guidelines on filling details if applicant residence for tax purposes in jurisdiction(s) outside India:<br>• Jurisdiction(s) of Tax Residence: Since US taxes the global income of its citizen, every US citizen of whatever nationality, is also a resident for tax purpose in USA.<br>• Tax identification Number (TIN): TIN need not be reported if it has not been issued by the jurisdiction. However, if the said jurisdiction has issued a high integrity number with an equivalent level of identification (a "Functional equivalent"), the same may be reported. Examples of that type of number for individual include, a social security/insurance number, citizen/personal identification/services code/number and resident registration number).<br>• In case applicant is declaring US person status as 'No' but his/her Country of Birth is US, document evidencing Relinquishment of Citizenship should be provided or reasons for not having relinquishment certificate is to be provided.<br>• In case applicant is declaring US person status as 'Yes', provide PAN and 'father name' in addition to details required under section 9 of form.<br>• In case the applicant is unable to affix signature, Left Thumb Impression in case of male and Right Thumb Impression in case of female should be affixed and in case there is no hands, toe impression of the applicant to be provided. The thumb / toe impression should be attested by two persons, one of whom should be the designated nodal officer attesting the same under his/her official seal and stamp. |

**General Information for Subscribers**

a) The Subscriber can obtain the status of his/her application from CRA and respective Nodal Office.
b) Subscribers are advised to retain the acknowledgement slip signed/ stamped by the designated respective nodal office where they submit the application.
c) For more information / clarifications, contact CRA:
Website:
Call:
Address of CRA.

**Annexures - Subscriber Registration Form for Government Sector applicants** *(Tick and fill applicable annexures below)*

| | |
|---|---|
| **Annexure I - Print PRAN Card in Hindi** (Fill the details in Devanagari script) | |
| **Applicant's First Name** | |
| Middle Name | |
| Last Name | |
| **Father / Mother's First Name** | |
| Middle Name | |
| Last Name | |
| **Annexure II - If Alphabets of name exceeded the space provided on page 1 of the application form** | |
| **Applicant's First Name** | |
| Middle Name | |
| Last Name | |
| **Father's First Name** | |
| Middle Name | |
| Last Name | |
| **Mother's First Name** | |
| Middle Name | |
| Last Name | |